सत्यमेव जयते

# राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

निवडणूक तात्काळ

क्रमांक :- रानिआ/जिपपंस-२०२०/प्र.क्र.०९/ का.७
नवीन प्रशासन भवन, मादाम कामा रोड,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- ०३ नोव्हेंबर, २०२०

प्रति,
विभागीय आयुक्त,नागपूर
जिल्हाधिकारी, गोंदिया

**विषय :-** गोंदिया जिल्हा परिषद व त्याअंतर्गत
<u>८ पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणूका</u>
सुधारीत प्रभाग रचना व आरक्षण सोडत कार्यक्रम.

**संदर्भ :-** १) राज्य निवडणूक आयोगाचे समक्रमांकाचे दि.१४ फेब्रुवारी, २०२० चे आदेश
२) राज्य निवडणूक आयोगाचे क्रमांक. रानिआ/जिपपंस/मनपा२०२०/ प्र.क्र.७/ का.५, दि.१७/०३/२०२०
३) राज्य निवडणूक आयागाचे पत्र क्र.रानिआ/ग्रापनि२०२०/प्र.क्र.११/का.८, दि. २० एप्रिल, २०२०
४) राज्य निवडणूक आयागाचे पत्र क्र.रानिआ/जिपपंस-२०२०/प्र.क्र.९/का.७, दि. १९ जून, २०२०

महोदय/महोदया,

राज्य निवडणूक आयोगाचे संदर्भांकित अ.क्र.१ च्या पत्रान्वये आपल्या जिल्हयातील जिल्हा परिषद व त्याअंतर्गत ८ पंचायत समित्यांच्या प्रभाग रचना व आरक्षण सोडतीचा कार्यक्रम देण्यात आला होता. तथापि, राज्यात कोरोना विषाणू (कोव्हिड-१९) चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाय म्हणून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूका पुढे ढकलण्याबाबत राज्य शासनाने विनंती केल्यानुसार आयोगाचे अ.क्र.२ समोरील दि.१७ मार्च, २०२० च्या पत्रान्वये राज्यातील सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचे कामकाज ज्या टप्प्यावर असतील त्या टप्प्यावर पुढील आदेशापर्यंत स्थगित करण्यात आले. तद्नुसार गोंदिया जिल्हा परिषद व त्याअंतर्गत ८ पंचायत समित्यांच्या प्रारुप

प्रभाग रचना व आरक्षण सोडतीवर आक्षेप व हरकती मागविण्याच्या टप्प्यावरील कामकाज पुढील आदेशापर्यंत स्थगित करण्यात आले.

२. आता, सदर पत्राद्वारे गोंदिया जिल्हा परिषद व त्याअंतर्गत ८ पंचायत समित्यांच्या प्रारुप प्रभाग रचना व आरक्षण वर हरकती व सूचना मागविणे, प्राप्त हरकती/ सूचनांवर सुनावणी देऊन प्रभाग रचना व आरक्षण अंतिम करण्यासाठी सोबतच्या **प्रपत्र-१** मध्ये सुधारीत कार्यक्रम देण्यात येत आहे. या सुधारीत कार्यक्रमास प्रसिध्दी देण्याबाबत जिल्हाधिकारी यांनी आवश्यक ती कार्यवाही करावी. तसेच सदरचा सुधारीत प्रभाग रचना व आरक्षणासंदर्भातील हरकतदारांना सुनावणी आयोजित करताना, सार्वजनिक आरोग्य विभाग यांनी कोरोना विषाणू (कोव्हिड-१९) या साथीच्या आजाराच्या अनुषंगाने दिलेल्या सूचनांचे पालन करावे तसेच पुढे नमूद केल्याप्रमाणे खबरदारी घेण्यात यावी :-

१) सर्व हरकतदारांना एकत्र न बोलावता प्रत्येक हरकतदाराकरिता कमीतकमी १० मिनिटांच्या अंतराने स्वतंत्र वेळ देऊन बोलवणे.
२) सर्वांच्या बैठकीची व्यवस्था पुरेसे अंतर ठेवून करणे
३) मास्क वापरणे
४) सामाजिक अंतर ठेवणे
५) सॅनिटायझरचा वापर करणे.
६) आवश्यकतेनुसार थर्मल स्क्रिनिग करणे.

३. तसेच राज्य निवडणूक आयोगाचे दि.१४/०२/२०२० रोजीच्या पत्रान्वये देण्यात आलेल्या आदेशातील मुद्दा क्र.५.५ व ५.६ मध्ये नमूद केलेल्या सूचनांचे पालन करावे. तसेच प्रभाग रचना व आरक्षणासंदर्भात यापूर्वी दि.१६/०३/२०२० ते १७/०३/२०२० या कालावधीत प्राप्त झालेल्या हरकती व आक्षेप विचारात घेण्यात यावेत.

मा.राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

आपला,

(अविनाश सणस)
उपायुक्त,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

प्रत :- प्रधान सचिव, ग्राम विकास विभाग, बांधकाम इमारत, मर्झबान पथ, फोर्ट, मुंबई -४०० ००१

राज्य निवडणूक आयोगाचे पत्र क्र रानिआ/जिपपंस-२०२०/प्र.क्र.०९/का.७, दि.०३/११/२०२० सोबतचे सहपत्र)

## गोंदिया जिल्हा परिषद व त्याअंतर्गत ८ पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणूका

## टप्पा क्र.ब) प्रारुप प्रभाग रचना व आरक्षण संदर्भात हरकती सादर करणे व त्यापुढील टप्पा सुधारीत प्रभाग रचना व आरक्षण कार्यक्रम

| अ.क्र. | टप्पा | कार्यवाही कोणी करावयाची आहे | टप्पा सुरु करण्याचा संपविण्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| **ब) हरकती व सूचना तसेच सुनावणी** | | | |
| १ | जिल्हाधिकारी यांच्याकडे हरकती व सूचना सादर करण्याचा कालावधी | - | ११/११/२०२० ते २०/११/२०२० |
| २ | प्राप्त झालेल्या हरकती व सूचनांवर सुनावणी देऊन निवडणूक विभाग / निर्वाचक गण रचना अंतिम करणे | विभागीय आयुक्त | २७/११/२०२० पर्यंत |
| **क) अंतिम प्रभाग रचना** | | | |
| ३ | अंतिम प्रभाग रचना व आरक्षण शासन राजपत्रात प्रसिध्द करणे | जिल्हाधिकारी | ०२/१२/२०२० पर्यंत |

टिप :- विभागीय आयुक्त व जिल्हाधिकारी यांच्या कार्यालयातील नोडल ऑफीसर यांनी प्रत्येक टप्प्यावरील कामकाजाबाबत आयोगास अहवाल सादर करावा.

(अविनाश सणस)
उपायुक्त,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र